चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१७ ऑक्टेंबर, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)

# निवडणुकीच्या पार्श्वभुमिवर घुग्घुस पोलीसांची दारूतस्कराविरूध्द कार्यवाही

## ०२ वाहन आणि ०६ आरोपीसह १३ लक्ष ५४ हजाराचा मुददे्माल जप्त

दिनांक १७/१०/२०१९ रोजी पोलीस स्टेशन घुग्घुस येथील पोलीस पथक एसएसटी पॉईन्ट नकोडा येथे नाकेबंदी करीत असतांना मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार एका चारचाकी अशोक लेलॅन्ड कपंनीच्या मालवाहु आणि एका टाटा सुमो वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये ०५ इसम मिळुन आले. सदर इसमांना विचारपुस करून संशयावरून वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये एक छुपा विशेष कप्पा तयार केलेला दिसुन आला. त्याची तपासणी केली असता, त्यामध्ये ५० बॉक्स देशी दारूचा माल किं. ५,००,०००/—रू, ०६ बॉक्स मॅकडॉल नंबरवन कंपनीची विदेशी दारू प्रत्येकी एक बॉटल एकुण किं ९,०००/—रू, दारूचा माल मिळुन आला. सदर दारूचा माल आणि दारू वाहतुकीकरीता वापरलेले वाहन अशोक लेलॅन्ड विना नंबरचा किं. ५,००,०००/—रू, एक टाटा सुमो क्र. एमएच १७ क्यु १४६६ किं. ३,००,०००/—रू आणि ०४ मोबाईल फोन किं. ४५,०००/—रू **असा एकुण १३,५४,०००/—रू** चा मुददे्माल जप्त करण्यात आला आहे.

सदचा गुन्हा पोलीस स्टेशन घुग्घुस येथे अप.क्र. २६८/२०१९ कलम ६५(अ),८३ मदाका, ५०(१)(ब)/१७७,१३०/१७७ मोवाका अन्वये नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे **१)** रिंकेश मुर्लीधर ठाकरे वय २५ रा. भिवापुर वार्ड चंद्रपुर, **२)** अभिशेख संजय साव वय २१ रा. भिवापुर वार्ड चंद्रपुर, **३)** महेश भास्कर परचाके वय २२ रा. भिवापुर वार्ड चंद्रपुर, **४)** अफरोज इकबाल शेख वय २७, रा. भिवापुर वार्ड चंद्रपुर, **५)** विशाल प्रकाश डोंगरे वय ३५, रा. भिवापुर वार्ड चंद्रपुर यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही श्री. डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन घुग्घुस प्रभारी पोनि. श्री. आमले, यांचे नेतृत्वात, म.सपोनि. गोखरे यांचे सह सफौ. आमटे, पोशि. विनोद, सुधिर, सचिन, योगेश यांनी पार पाडली.

———————————————————————————————————————